Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) [Yr. 2014]

ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 12 | Jan - 2016







# नव्वदोत्तरी मराठी कवितेचे स्वरूप

प्रा. डॉ. भास्कर निफाडे
रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

## १९८५ नंतरचे साहित्य :—

गेल्या तीन दशकात मराठीत काय लिहिले गेले, हे पाहिल्यास त्यावरून समकालीन मराठी साहित्याची स्थिती व गती लक्षात येईल, असे मला वाटते. एखाद्या भाषेतले साहित्य हीच एक व्यापक संहिता आहे. असे मानल्यास या संहितेचा तिच्या बाह्य जगाशी, बाहेरच्या स्थळ—काळाशी काही एक संबंध असतो असे दाखवता येईल. प्रत्येक कवि आपापल्या अनुभवविश्वाशी प्रामाणिक असतो हे खरेच आहे. परंतु त्याचे अनुभवविश्व हे स्वायत्त वा बंदिस्त नसते. त्याच्या लेखनाच्या बाहेरच्या जगात तो असतो. त्या बाहेरच्या जगाशी सतत चाललेल्या मानसिक—वैचारिक संघर्षातून त्याचे काव्यगत अनुभवविश्व आकार घेत असते. तो आपल्या वर्तमानात आपल्या सगळ्या प्रतिक्रिया लेखनातून व्यक्त करीत असतो. याही अर्थाने ते 'समकालीन' लेखन असते.

ऐंशीच्या उत्तरार्धात आपण राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक बदलाचा अनुभव घेतला. या काळात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढत चाललेला दहशतवाद, भिन्नधर्मी समाजातील तेढ, जातीय दंगली, राजकीय क्षेत्रातील चाललेला हिंसेचा अतिरेक इत्यादी गोष्टीबरोबरच चंगळवादही वाढीस लागलेला आपल्या प्रत्ययास आला. याच काळात दूरदर्शनचे रंगीत प्रक्षेपण सुरू झाले. पुढे अनेक देशी—विदेशी चित्रवाहिनी सुरू झाल्या. मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार आणि मुलतत्त्ववादाला मिळणारा पाठिंबा याही या दशकातील वास्तवाचा अपरिहार्य भाग बनलेल्या गोष्टी आहेत. सातत्याने जाणवणारी राजकीय सत्तेची अस्थिरता आणि वैश्विकीकरणाची चाहूल या गोष्टीही आजच्या काळाचा भाग आहेत.

काळाचा हा संदर्भ केवळ मराठी साहित्यापुरता मर्यादित आहे असे नाही. सगळ्याच भारतीय भाषांमधल्या साहित्य लेखनाला हा संदर्भ आहे. अर्थातच कोणत्याही भाषेतल्या साहित्यात हेच आणि एवढेच प्रश्न आहेत असेही नाही. व्यक्ती, समूह, समुहातील व्यक्ती, त्यांचे परिणाम, व्यक्ती—व्यक्तीमधले संबंध अशा विविध पातळ्यावरच्या मानवी जीवनाचा शोध लेखक, कवि घेत असतो. साहित्यकृती म्हणजे केवळ सामाजिक दस्तऐवज नव्हे, ती वाङ्मयीन कलाकृती असते. मात्र समकालीन जगण्याचा संदर्भ हा बहुतेक वाङ्मयीन कृतींना असतो यात संशय नाही.

निर्मितीक्षम असलेले मन भविष्यात येणाऱ्या प्रत्येक नव्या क्षणासाठी सज्ज असते. त्या काळातील घटितांशी कलावंताच्या पिढीचं अतूट असं नातं असतं. स्व आणि स्वेतर विश्वामधील संवादित परिसर, त्यामध्ये होणारे सततचे जोड आणि मोडकाम, असंतोष आणि संतोषजन्य प्रक्रियेपर्यंत ओढणारी आणि मोडणारी व्यवस्था ही स्पंदनं दोन्ही पातळीवर अधोरेखित करणारी कलावंतांच्या प्रत्येक पिढीचं भान निहित करणारी व्यवस्था कारणीभूत असते. त्या व्यवस्थेचा प्राप्त परिस्थितीशी नाळेइतका घट्ट संबंध असतो. म्हणून आजही मराठी कविता हो कोणत्या प्राप्त परिस्थितीचा परिपाक आहे, तिचं समकालिनत्व कोणत्या मुलभूत घटनांशी निगडित आहे, हे प्रथम पाहावे लागेल.

१९९० नंतर कविता हा वाङ्मयप्रकार अधिक गांभीर्यपूर्ण व सजगपणे स्विकारला जात असल्याचे लक्षात येते. या दोन दशकांत संख्येच्या दृष्टीने पाहिल्यास कवितेपर्यंत पोहचणाऱ्या कविंची संख्या तीसपर्यंत कशीबशी जाऊन पोहचते. त्यातील फार थोड्या लोकांचे एका संग्रहापलीकडे फारसे योगदान नाही. बव्हंशी कविता ही स्फूट स्वरूपात अनियतकालिकांमध्ये उपलब्ध आहे आणि काही कवींचे छोटेखानी संग्रह निघाले आहेत. त्यातही कवितेमध्ये चांगलं घडण्याचं काम नव्वदनंतर प्रकर्षाने दृष्टिक्षेपात येतं. एकंदर पंधरा कवी आपल्या गुणवैशिष्ट्यांनी वाटचाल करताना दिसतात. उठसूट कविता आणि संग्रहांमागून संग्रह काढत राहणे हा उद्योग या दशकामध्ये नवं तंत्रज्ञान उपलब्ध असूनही वाढीस लागला नाही, असे दिसते. संख्येपेक्षा गुणात्मक वाढझाल्याचे निदर्शनास येत असल्याचे या परिस्थितीवरून वाटावे.

कवितेतील आशयाचे अंगाने, अभ्यासाच्या दृष्टिकोनातून ढोबळपणे स्विकारण्यात आलेले वर्गीकरण (उदा. सामाजिक, राजकीय, प्रेमकविता, गूढ गुंजनात्मक कविता इ.) या दशकातील कवितांमधून काढणे अशक्यप्राय आहे. ह्या सगळ्या प्रवाहाची सूक्ष्म समज सबंध कविताभर पसरलेली दिसते. तिला समजून घेणे विश्लेषणाच्या पातळीवरच शक्य आहे. सगळे प्रवाहच येथे मानसिक बदलाच्या स्वरूपामध्ये भेटताना दिसतात. एवढे सुक्ष्म बदल आणि समज आशयाच्या अंगाने या कवितामधून दिसतात. त्यामुळे तिचे सरळसरळ वर्गीकरण करणे दुरापास्त आहे. कवितागत मी च्या क्षेत्र सहभाग आणि अवकाशवाढीची ही कविता साक्ष देते.

कवितेच्या अंमलाखाली भाषेला वाकविण्याचे, राबविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आजच्या कवितेतील काही कवींनी अत्यंत डोळसपणे केले आहे. भाषेच्या जवळ जाणारे अर्थवाही संवादित्व निर्माण केले आहे. कविता व्यवहाराला अनुभवाच्या अग्रावरील शब्दवहनाच्या पुनरावृत्तीची प्रक्रिया अस्सल अनुभवाचं चिरंतनत्व धोक्यात आणत असल्यामुळे रूटीन शब्दांना आचार, विचार व आवर्तनाचे विस्तार रूप तत्कालीन शब्दातून, भाषा व्यवहारातून देण्याचा प्रयत्न मंगेश नारायणराव काळे, नितीन कुलकर्णी यांची कविता करताना दिसते. मंगेश काळेंची कविता तर एक सांस्कृतिक आलेखच वाटतो. श्रीधर तिळवेची कविता, मानव्य, गरजा व मांगल्य विश्वाच्या पृष्ठभागावर प्रस्थापित केलेली नाही, अपरिहार्य संवाद आणि संबंधाची ठसठशीत जाणीव मुखर करते.

१९९० च्या अगोदरचा कालपट पाहत असताना स्त्रियांच्या जाणिवेचे विश्व मी, तू, घरदार, प्रियकर या सोज्ज्वळ संकलपनांभोवतीच फिरताना दिसते. काही कवयित्रींमध्ये अपवादाने ह्या जाणिवेची विस्तार झालेला असला तरी पूर्ण अंशाने ती सर्वस्पर्शी होत नाही. या दशकामध्ये स्त्रीवादी कवितेमधील बदल लक्षात घेण्यासारखे आहेत. स्त्रीसंदर्भातील परंपरागत कारुण्य, अगतिकता याबरोबर दलित कवितेने तिच्याकडे परिवर्तित केलेला विद्रोहाचा स्फोटक अनुभवही ती देते आहे. एकंदर कवितेचा घाट, तिची आंतरिक व बाह्य घडण याबद्दल ती आज सजग झाल्याचे दृष्टीस येते. चौकटीतील सैरभैरपणा तिने सोडलेला असून, संक्रमणाच्या पवित्र्यात ती उभी आहे. हा मूलभूत बदल स्त्रीवादी कवितांमधून स्पष्टपणे दिसून येतोत्र साठोत्तरी कवितेचा Blank Space तिने भरून काढलेला आहे. बंधनमुक्ततेकडे तिची वाटचाल सुरू आहे.

मनवी उत्थानासाठी निर्माण झालेली सेवास्तरीय अस्थापनांच्या मूल्यांची बेसुमार उतरण, व्यक्तिनिष्ठ आदर्शवादाचा लोभ ह्या सांस्कृतिक मानसिकतेच्या घटना दशकातील जनमानसापर्यंत थेट भिडलेल्या दिसतात. त्याचे पडसाद रमेश इंगळे उत्रादकार यांच्या कवितांमधून प्रकर्षाने उमटतात. कवी व्यक्ती म्हणून जे अनुभवक्षेत्र निवडतो, त्या अनुभवक्षेत्राच्या अवकाशाला सामाजिकता अशी चिकटून येते की तिला अव्हेरता येत नाही आणि वास्तव वेगळेही करता येत नाही. अशा भिनलेपणाच्या नात्यातून हा विषय त्यांनी कवितेतून नवेपणाने आणला आहे. सांस्कृतिक अभिसरणाच्या स्त्रोताच्या मुळाशीच ती उगवल्यासारखी वाटते.

वाङ्मयीन भानातून डोळसपणे स्विकारलेली प्रयोगशीलता या दशकातील वैशिष्ट्यं मानावं लागेल. कवितांतर्गत भाषिक अवकाशास आपल्या व्यवहाराच्या आणि जगण्याच्या पातळीला समांतर नेण्याचे प्रयोग कवितेतून होत आहेत. विविध क्षेत्रात कार्यरत असताना होणारी घुसमट मिळालेल्या भाषिक संचितातून व्यक्त होणे अवघड आहे किंवा पारंपारिक कसरतीतून बाहेर पडून कृतक जोखडामध्ये अडकणे तिला जमण्यासारखे नाही. प्रामुख्याने या निर्मितीच्या छटा, मन्या जोशी आणि नितीन अरुण कुलकर्णी यांच्या कवितेमधून वेगवेगळ्या स्वरूपातून प्रगट होताना दिसतात. आपल्या अत्यंत खाजगी ठेवणीतील अनवट शब्द भाषेच्या दालनामध्ये प्रविष्ट करण्यासाठी अनुभवित वस्तू आणि त्याभोवती जनमानसामध्ये रूजलेलं वलय, त्याच शक्यतेतून कवितांमधून मांडतांना दिसतात. शब्दांना प्रायोगिक तत्त्वावर राबवून रूजविण्याचे धाडस या कवितांमधून घडताना दिसते.

आजच्या कवितेने निर्मितीतून विविधांगी रूप धारण केल्यामुळे अभ्यासाच्या दृष्टिकोनातूनच विश्लेषणात्म पातळीवर काम करणे अत्यंत कठीण आहे.कवितेचा एकल प्रवासही कोणतीतरी Vision घेऊनच प्रगट होतो. आपले अनुभवजन्य संचित मराठी कवितेला बहाल करणाऱ्या या प्रक्रियेमध्ये बरेच कवी आहेत.

आजच्या कवितेतून काही विशेष आपणास हाती लागतात. ते तसे – भाषिक प्रयोगाचे आकर्षण, व्यवहारातील शब्दांचे अनाकलनीय विशेष, दीर्घ कवितांमध्ये जाणवलेला कमालीचा संज्ञाप्रवाह, पारंपरिक मूल्यांचे नवमूल्यांमध्ये झालेले रोपण, काही मूल्ये आणि संकल्पना नव्या बदलाच्या अवस्थेत स्थैर्य न टिकविल्यामुळे बाद होण्याच्या प्रक्रियेत व्यवस्था (System) च्या शोधात चाचपडत आहेत. ही कविता जितकी आत्मनिष्ठपणे व्यक्त झाली आहे, तेवढीच वस्तुनिष्ठ जाणीव तिने जोपासली आहे. स्व विश्वाशी निगडीत असली तरी चाचपडत नाही, तिचा बहिर्मुखीपणाही विचारात घेण्यासारखा आहे. ही खरे तर 'स्व'च्या ग्रोथची, मनाच्या अवकाशवाढीची कविता आहे.

आजची कविता एकसुरी नसली तरी काही सांप्रत मूल्य व्यवस्थांना स्पर्श करून जात नाही. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपण उभे आहोत. जेथून अत्यंत पारदर्शित्वातून माणसाकडे, त्याच्या एकंदर व्यवहाराकडे अत्यंत स्पष्ट स्वरूपात पाहिले जाण्याची प्रक्रिया सुरू आहे. सर्व स्तरांवरील मूल्यव्यवस्था कोसळत आहे, भाव—भावनांच्या तांत्रिकीकरणाची, नवे संवादित्व निर्माण होण्याची शक्यता आहे. ह्या सर्व बदललेल्या विश्वातून कवितेला आपलं स्थान टिकवायचं आहे व मानवी कलाव्यवहार समांतर पातळीशी जोडून नव्याने पुढे जायचे आहे. हीच कलावंत आणि कलाकृतीची, संस्कृतीमधील देण्याची — घेण्याची प्रक्रिया आहे. या कवितेला स्वत:चा काही अंशी समकाळाचा तोंडवळा असला तरी काळाचे सर्वंकष प्रतिनिधित्व ती करू शकत नाही मात्र नव्या मूल्यव्यवस्थेला तिने स्पर्श केलेला जाणवतो.

संदर्भ :—

१. डहाके वसंत आबाजी, नवसाहित्य आणि नवसाहित्योत्तर साहित्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
२. काळे दा. गो., आजच्या कवितेविषयीच्या नोंदी, अनाघ्रात, अर्धवार्षिक, २००५.
३. जाधव मनोहर, देशमुख श्रीकांत (संपा.), समकालिनसाहित्य चर्चा (डॉ. नागनाथ कोत्तापल्ले गौरव ग्रंथ), प्रतिमा प्रकाशन, पुणे, २०१०.
४. मिरजकर निशिकांत (संपा.), नव्या वाटा नवी वळणे, यात्रा बुक्स, नवी दिल्ली, यांचे सहकार्याने द्वारा पेंग्विन बुक्स, इंडिया, नवी दिल्ली, २००८.